RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक २१] मंगळवार, ऑक्टोबर १५, २०२४/आश्विन २३, शके १९४६ [पृष्ठे ६ , किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.**— महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. | **पृष्ठे** **१-६** |


**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIII OF 2024.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC LIBRARIES ACT, 1967.

**सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.**

**महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६७ चा महा. ३४ **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) अध्यादेश, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (एक) मधील, "दृकश्रुती माहितीसाठी वापरण्यात येणारी रंगचित्रे, चलचित्रे, सरकचित्रे, तबकड्या व फिती ( टेप्स )" या मजकुरानंतर, "इ-पुस्तक, इ-नियतकालिके, इ-माहितीकोष यांसारखी इ-संसाधने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१९६७ चा महा. ३४.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,–

(क) पोट-कलम (२) मधील,–

(एक) खंड (तीन) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :–

" (तीन- अ) महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे प्रधान सचिव किंवा सचिव;

(तीन-ब) संचालक, माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन";

(दोन) खंड (पाच), (आठ), (नऊ) व (दहा) वगळण्यात येतील;

(तीन) खंड (बारा) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :–

"(बारा) प्रत्येक विभागीय ग्रंथालय संघाचा अध्यक्ष;";

(चार) खंड (चौदा) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल:-

" ( चौदा) राज्य शासनाच्या मते, ज्यांना ग्रंथालय सेवाविषयक बाबींचे विशेष ज्ञान किंवा रुची किंवा प्रत्यक्ष अनुभव असेल अशा इसमांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे तीन सदस्य :

परंतु, तीन सदस्यांपैकी एक सदस्य, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ खालील विद्यापीठाचा संचालक, ज्ञान संसाधन केंद्र हा पदसिद्ध सदस्य असेल व एक सदस्य महिला असेल;";

२०१७ चा महा. ६.

(ख) पोट-कलम (३) मधील, "निवडण्यात येईल" या मजकुराऐवजी, " नामनिर्देशित करण्यात येईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ यात कलम ४अ समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :–

इतर समित्या.

"**४अ.** (१) परिषदेस, अशा प्रयोजनार्थ, तिची कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा प्रयोजनांसाठी समित्या घटित करता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये परिषदेने घटित केलेल्या प्रत्येक समितीच्या सदस्यांची संख्या, तिच्या सदस्यांचा पदावधी, अशा समितीच्या सदस्यांनी करावयाची कर्तव्ये आणि पार पाडावयाची कार्ये, परिषदेद्वारे ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ ऐवजी, पुढील कलमे दाखल करण्यात येतील :— सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ६ ची सुधारणा.

"**६.** कालप्रवाहाव्यतिरिक्त अन्यथा रिक्त होणाऱ्या परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांचे रिक्त पद, नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल, आणि रिक्त पद भरण्यासाठी नामनिर्देशित केलेला इसम ज्या सदस्याच्या जागी तिला नामनिर्देशित केले असेल त्या सदस्याच्या उर्वरित पदावधीसाठीच केवळ पद धारण करील. परिषदेतील नैमित्तिक रिक्त पदे.

**६अ.** (१) शासन, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, जर परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यास,— सदस्यांना काढून टाकणे.

(अ) नैतिक अधः पतनाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील एखाद्या न्यायालयाद्वारे दोषसिध्द ठरविण्यात आले असेल; किंवा

(ब) तो अविमुक्त नादार झाला असेल आणि तो तसा असल्याचे सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल; किंवा

(क) राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा वैद्यकीय प्राधिकरणाद्वारे त्याला शारीरिकदृष्ट्या विकलांग म्हणून घोषित करण्यात आले असेल; किंवा

(ड) तो, विकल मनाचा असेल व सक्षम न्यायालयाने तो तसा असल्याचे घोषित केले असेल; किंवा

(इ) परिषदेची ध्येये व उद्दिष्ट्ये यांना अहितकारक असेल अशा मार्गाने कृती करीत असेल, तर, आदेशाद्वारे,

अशा कोणत्याही नामनिर्देशित सदस्यास काढून टाकू शकेल :

परंतु, त्याला म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, पदावरून काढून टाकण्यासाठी खंड (इ) अन्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) राज्य शासन, शासनाच्या मते, परिषदेच्या नियुक्त किंवा नामनिर्देशित केलेल्या ज्या सदस्याच्या, कृती, परिषदेच्या योग्य कामकाजासाठी अहितकारक असतील किंवा त्यात अडथळा आणीत असतील अशा कोणत्याही सदस्यास, आदेशाद्वारे, स्वतःहून काढून टाकू शकेल :

परंतु, कोणत्याही सदस्यास म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, त्याला पदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(३) पोट-कलमे (१) व (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिषदेचा नामनिर्देशित सदस्य, शासनाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील आणि शासनाद्वारे, जर त्यास योग्य वाटले तर, कोणत्याही वेळी त्यास पदावरून काढून टाकण्यात येईल.".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (२) मधील,— सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ९ ची सुधारणा.

(क) खंड (ड) मधील, "विभागीय" या मजकुरानंतर, ", जिल्हा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ख) खंड (ह) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ह- १) सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींच्या प्रशिक्षणासाठी कार्यक्रम आयोजित करील व घेईल;".

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ११ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये,–

(१) पोट-कलम (१) मधील, "व प्रत्येक विभागाकरिता एक विभागीय ग्रंथालय" या मजकुराऐवजी, "प्रत्येक विभागासाठी एक विभागीय ग्रंथालय व प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा ग्रंथालय" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) मधील, "मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५० चा मुंबई २९. १९५० चा २९.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये,–

(क) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :–

"(२) समितीमध्ये, पुढील सदस्यांचा समावेश असेल :–

| अ. क्र.<br>(१) | पदनाम<br>(२) | समितीमधील पदनाम<br>(३) |
|---|---|---|
| (एक) | जिल्ह्याचा जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, | अध्यक्ष; |
| (दोन) | जिल्ह्याचा नियोजन अधिकारी, | सदस्य; |
| (तीन) | जिल्ह्याचा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), | सदस्य; |
| (चार) | जिल्हा ग्रंथालय संघाचा अध्यक्ष, | सदस्य; |
| (पाच) | राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले दोन इसम, जे जिल्ह्यातील ख्यातनाम साहित्यिक व्यक्ती असतील, त्यांपैकी एक महिला असेल, | सदस्य; |
| (सहा) | जिल्हाधिकाऱ्याने जिल्ह्यातून नामनिर्देशित केलेले तीन इसम, त्यांपैकी एक सार्वजनिक ग्रंथालयाचा पदाधिकारी, सार्वजनिक ग्रंथालयाचा ग्रंथपाल व महाविद्यालयातील ग्रंथपाल असेल आणि त्यांपैकी एक महिला असेल, | सदस्य; |
| (सात) | संबंधित जिल्हा ग्रंथालयाचा जिल्हा ग्रंथालय अधिकारी, | सदस्य-सचिव."; |

(ख) पोट-कलम (३) वगळण्यात येईल.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ यात कलम १५अ समाविष्ट करणे.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :–

समितीच्या सदस्यांना काढून टाकणे.

"**१५अ.** कलम ६अ च्या तरतुदी, समितीच्या कोणत्याही नामनिर्देशित सदस्यास काढून टाकण्यासाठी, योग्य त्या फेरफारांसह, लागू असतील.".

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मधील, खंड (एक) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :– सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १६ ची सुधारणा.

" (एक) जिल्ह्यातील ग्रंथालय सेवेच्या विकासाशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबींवर परिषदेस सल्ला देणे;".

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, पोट-कलम (२) मधील,– सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १८ ची सुधारणा.

(क) खंड (क) मध्ये,–

(एक) "विकासासाठी" या मजकुरानंतर, " व आधुनिकीकरणासाठी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) " आणि" हा मजकूर वगळण्यात येईल.

(ख) खंड (ड) मध्ये, "अंशदाने अथवा देणग्या;" या मजकुरानंतर, "आणि" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (ड) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :–

" (इ) सार्वजनिक ग्रंथालयांसाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेने, खाजगी विश्वस्तव्यवस्थेने, सहकारी संस्थेने, स्थानिक प्राधिकरणाने, कंपनीने व औद्योगिक उपक्रमाने दिलेले कोणतेही अंशदान किंवा देणग्या.".

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम २६ नंतर, पुढील कलमे ज्यादा दाखल करण्यात येतील :– सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ यात कलम २७ व २८ समाविष्ट करणे.

"**२७.** परिषदेची किंवा कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ अशा परिषदेतील किंवा समितीतील कोणतेही पद रिक्त आहे किंवा तिच्या रचनेत कोणताही दोष आहे केवळ या कारणावरून अविधीग्राह्य ठरणार नाही. केवळ रचनेत दोष व रिक्त पद असल्याच्या कारणांवरून कृती व कार्यवाही अविधीग्राह्य न ठरणे.

**२८.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांन्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणत्याही इसमाविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.". सद्‌भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

## निवेदन

महाराष्ट्र राज्यात, सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, परिरक्षण, संघटन व विकास यासाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ (१९६७ चा महा. ३४) अधिनियमित करण्यात आला आहे.

२. समाजातील वाचनाच्या सवयींच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्याकरिता, वाचनासाठी आधुनिक तंत्रशास्त्रीय साधनांचा वापर करण्याकरिता, समाजातील बदलत्या वातावरणात, वाचन संस्कृतीचा व ग्रंथालय चळवळीचा विकास करण्याकरिता व ती वृद्धिंगत करण्यासाठी, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ यांची कलमे २, ३, ६, ९,११,१३,१६ व १८ यांमध्ये सुयोग्य सुधारणा करून आणि नवीन कलमे ४अ, १५अ, २७ व २८ दाखल करून त्याद्वारे राज्य ग्रंथालय परिषद व जिल्हा ग्रंथालय समिती यांच्या कार्यपद्धतीची पुनर्रचना करणे व ती सुरळीत करणे इष्ट आहे, असे वाटते.

३. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :–

(क) पुस्तकाच्या व्याख्येमध्ये, इ-पुस्तके, इ-नियतकालिके, इ-माहिती कोष यांसारख्या संसाधनांचा समावेश करणे;

(ख) परिषदेचा सदस्य म्हणून संबंधित शासनाच्या विभागांमधील अशा अन्य कोणत्याही इसमांचा समावेश करणे;

(ग) परिषदेद्वारे अन्य समित्या घटित करण्यासाठी तरतूद करणे;

(घ) परिषदेच्या सदस्यांना काढून टाकण्यासाठी तरतूद करणे;

(ङ) ग्रंथालय निधीतून सहाय्यक अनुदान व त्याचे संवितरण करण्याच्या प्रयोजनार्थ मान्यता देण्यासाठी जिल्हा ग्रंथालयांचा समावेश करणे;

(च) प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे व ते घेणे ;

(छ) प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यासाठी तरतूद करणे;

(ज) सार्वजनिक ग्रंथालयांकरिता सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेने, सहकारी संस्थेने, स्थानिक प्राधिकरणाने, कंपनीने व औद्योगिक उपक्रमाने दिलेले कोणतेही अंशदान किंवा देणग्या यांचा देखील ग्रंथालय निधीमध्ये समावेश असेल अशी तरतूद करणे.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई, **सी. पी. राधाकृष्णन,**

दिनांक १५ ऑक्टोबर २०२४. महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

, **विकासचंद्र रस्तोगी,**

शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.